लोकमत पान क्र.1

दि. 27/04/2023

# नक्षली हल्ल्यात ११ पोलिस शहीद

## आयईडी स्फोटात उडविले वाहन; दोन वर्षांतील सर्वांत मोठा हल्ला

**दंतेवाडा :** छत्तीसगडच्या दंतेवाडा जिल्ह्यात बुधवारी नक्षलवाद्यांनी एक वाहन उडवून दिल्याने दहा पोलिसांसह वाहनाचा चालक शहीद झाला. गेल्या दोन वर्षांत राज्यातील सुरक्षा दलांवर नक्षलवाद्यांनी केलेला हा सर्वांत मोठा हल्ला आहे.

पोलिस महानिरीक्षक (बस्तर रेंज) सुंदरराज पी. यांनी सांगितले की, राज्य पोलिसांचे जिल्हा राखीव दलाचे (डीआरजी) पथक नक्षलविरोधी मोहिमेवर असताना मध्यरात्री १ वाजण्याच्या सुमारास अरणपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत आयईडी वापरून हा स्फोट घडविण्यात आला. डीआरजी कर्मचारी बहुतेक स्थानिक आदिवासी लोकांमधून भरती केले जातात आणि त्यांना माओवाद्यांशी लढण्यासाठी प्रशिक्षित केले जाते.

ज्या भागात स्फोट झाला तो भाग राज्याची राजधानी रायपूरपासून सुमारे ४५० किलोमीटर इतक्या अंतरावर आहे. घटनास्थळी १० फूट खोल खड्डा दिसत असून, रस्ता दुभंगला आहे. या हल्ल्यात वाहन पूर्णपणे उद्ध्वस्त झाले. घटनास्थळाची छायाचित्रे समाजमाध्यमांमध्ये व्हायरल झाली आहेत.

या परिसरात दर्भा विभागात नक्षलवादी असल्याची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा कर्मचारी दंतेवाडा जिल्हा मुख्यालयातून निघाले होते. ते मिनी गुड्स व्हॅनमध्ये परतत असताना नक्षलवाद्यांनी अरनपूर आणि समेली गावांदरम्यान स्फोट घडवून आणले. या घटनेनंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मुख्यमंत्री भूपेश बघेल यांच्याशी चर्चा केली.

### नेमके काय झाले...

- नक्षलवाद्यांनी ४० किलो स्फोटक असलेले आयईडी वापरून स्फोट केला. सुमारे २०० सुरक्षा कर्मचारी दंतेवाडा जिल्हा मुख्यालयातून निघाले होते. बुधवारी सकाळी अरनपूरपासून सुमारे सात किमी अंतरावर नहाडी गावाजवळ गस्त पथक आणि नक्षलवाद्यांमध्ये गोळीबार झाला. त्यानंतर दोन संशयित नक्षलवाद्यांना पकडण्यात आले. त्यानंतर सुरक्षा कर्मचारी वाहनांच्या ताफ्याने त्यांच्या मूळ ठिकाणी परतत होते.
- वाहनांमध्ये सुमारे १००- १५० मीटरचे अंतर होते आणि नक्षलवाद्यांनी ताफ्यातील दुसऱ्या वाहनाला लक्ष्य केले. स्फोटानंतर सोबतच्या वाहनांमधील सुरक्षा कर्मचाऱ्यांनी जंगलाच्या दिशेने गोळीबार केला.

### छत्तीसगड, झारखंडमधील सक्रिय नऊ नक्षलींनी केले आत्मसमर्पण

**गोंदिया :** बलरामपूर (छत्तीसगड) जिल्ह्यातील सामरी पोलिस स्टेशन परिसरात आणि लगतच्या झारखंडमध्ये सक्रिय असलेल्या नऊ नक्षलवाद्यांनी बलरामपूरचे पोलिस अधीक्षक मोहित गर्ग यांच्यासमोर मंगळवारी आत्मसमर्पण केले. तीन नक्षलवाद्यांनी एक लोडेड बंदूक आणि एकाने आयईडी आणि स्फोटकांसह आत्मसमर्पण केले आहे. बहुतांश नक्षलवादी हे शस्त्र चालवणे, आयईडी पेरण्यातही निपुण आहेत.

### आजवरचे मोठे नक्षली हल्ले

**3 एप्रिल २०२१**
सुकमा व विजापूर जिल्ह्यांच्या सीमेवर हल्ल्यात २२ सुरक्षा कर्मचारी शहीद

**२१ मार्च २०२०**
सुकमा जिल्ह्यातील मिनपा भागात नक्षलवादी हल्ल्यात १७ जवान शहीद

**९ एप्रिल २०१९**
दंतेवाडा जिल्ह्यातील स्फोटात भाजप आमदार भीमा मांडवी यांचा मृत्यू, चार सुरक्षा कर्मचारी शहीद.

**२४ एप्रिल २०१७**
सुकमा जिल्ह्यातील हल्ल्यात २५ जवान शहीद

**६ एप्रिल २०१०**
ताडमेटलाच्या हल्ल्यात ७६ सुरक्षा जवान शहीद








राजधानी रायपूरपासून सुमारे ४५० किलोमीटर अंतरावर नक्षलवाद्यांनी पोलिसांच्या वाहनावर हल्ला केला. यासाठी ४० किलो स्फोटक असलेल्या आयईडीचा वापर करण्यात आला. या हल्ल्यात पोलिसांचे वाहन पूर्णपणे उद्ध्वस्त झाले आहे.

### पंतप्रधानांकडून श्रद्धांजली

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण केली आणि नक्षलवादी हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध केला. मोदी म्हणाले, त्यांचे बलिदान सदैव स्मरणात राहील.

पोलिसांवर झालेल्या भ्याड हल्ल्याने मी व्यथित झालो आहे. छत्तीसगडच्या मुख्यमंत्र्यांशी बोललो आहे. राज्य सरकारला सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले आहे.

- अमित शाह, केंद्रीय गृहमंत्री

नक्षलविरुद्धचा लढा शेवटच्या टप्प्यात असून, नक्षलवाद्यांना कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही

- भूपेश बघेल, मुख्यमंत्री

### भ्याड हल्ला: काँग्रेस

नक्षलवाद्यांचे हे भ्याड कृत्य असल्याचे काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि नेते राहुल गांधी यांनी म्हटले आहे. राहुल गांधी यांनी ट्वीट केले आहे की, दहा जवान आणि चालक शहीद झाल्याची बातमी दुःखद आहे. या कठीण काळात मी शहिदांच्या कुटुंबीयांसोबत आहे.

---

पुढारी पान क्र.4

# भाईंदरमध्ये चोरट्याने वृद्धेचे २ लाखांचे दागिने पळवले

**मिरारोड :** भाईंदर पूर्वेच्या नवघर पोलीस ठाणे हद्दीत एका वृद्ध महिलेला पत्ता विचारून त्यानंतर पैसे देण्याचे खोटे आमिष दाखवून महिलेचे दोन लाखाचे दागिने घेऊन दोघे फरार झाल्याची घटना घडली आहे. त्याप्रकरणी नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भाईंदर पूर्वेच्या आरएमपी पार्क येथे ललिता प्रल्हाद असावा ( ६५ ) या राहत असून त्या २५ एप्रिल रोजी बँकेत जात असताना त्यांना रस्त्यामध्ये एक अनोळखी इसम भेटला त्यावेळी त्याने बोरिवलीला जायला रेल्वे कोठून मिळते असे विचारले त्यावेळी त्या महिलेने समोर रेल्वे स्टेशन आहे असे सांगितले. थोडे पुढे गेल्यानंतर दुसरा एक अनोळखी इसम भेटला त्याने ही बोलण्याचा बहाणा करून ते दोन इसम एकत्र येऊन त्यांनी पैसे देण्याचे दाखवून रस्त्याच्या बाजूला त्यांना बोलावले. त्यावेळी हातातील सोन्याची बांगडी व गळ्यातील सोन्याची चैन अंदाजे दोन लाख रुपयाच्या किमतीचे दागिने काढून त्या महिलेच्या पर्स मध्ये न ठेवता हात चालखी करून घेवून गेले.

Scanned with CamScanner

पुण्यनगरी पू. पान क्र. ५

दि. 27/04/2023

# वसई-विरारमधील सीसीटीव्ही बंद



## पोलीस तपासात अडथळा, खबऱ्यांचा खर्च परवडत नाही

**नालासोपारा :** 'एक कॅमेरा शहरासाठी' शहरासाठी' या संकल्पनेतून मीरा-भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत लोकसहभागातून सीसीटीव्हीचे जाळे तयार करण्यात आले होते. घडलेल्या गुन्ह्यात गुन्हेगारांचा मागोवा घेण्यासाठी पोलिसांतर्फे सुरु करण्यात आलेल्या 'एक कॅमेरा शहरासाठी' या उपक्रमाला नागरिकांकडून चांगलाच प्रतिसाद मिळाल्याने आतापर्यंत ४ हजार ८२० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले होते. पण यातील अनेक सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. सीसीटीव्ही बंद असल्याने यांसारखे गुन्हे करून सहज फरार होत होते. त्यामुळे त्यांना पकडणें हे पोलिसांपुढे आव्हान होते. यासाठी 'एक कॅमेरा शहरासाठी' हा उपक्रम वसई विरारमध्ये सुरू करण्यात आला होता. त्यानुसार शहरातील महत्त्वाचे आस्थापने, दुकाने, मॉल, हॉटेल, कार्यालये, स्थानिक वसाहती, शैक्षणिक संस्था यांच्याकडील सीसीटीव्ही कॅमेरा सामाजिक जबाबदारीतून रस्त्याच्या दिशेने वळवण्यासाठी पोलिसांनी आवाहन केले होते. वसईसह मीरा भाईंदर शहरातील नागरिकांनाही कॅमेरा रस्त्याच्या दिशेने लावण्यासाठी आवाहन केले होते. त्यानुसार विविध सामाजिक संस्था, विविध आस्थापना मालक आणि इतर नागरिकांच्या सहभागातून संपूर्ण आयुक्तालय अंतर्गत सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले होते. पण गुन्हेगारांना शोधण्यासाठी लागलेले सीसीटीव्ही कॅमेरे बंद आहेत. या कारणाने चोरट्यांपर्यंत पोहोचणे पोलिसांना कठीण होत आहे.

■ गुन्हेगारांच्या हालचालींची माहिती मिळवण्यासाठी खबऱ्यांना जवळ केले जाते. बहुतांश वेळ खबऱ्या माहिती देण्यापूर्वी मोठी टीप असल्याचे सांगत पैसे मागतात. प्रत्यक्ष कारवाईत फारसे काही हाती लागत नाही. यामुळे पैसे मोजूनही पोलिसांची खबऱ्यांकडून फसवणूक होत असल्याचे अनेक उदाहरणे समोर आली आहेत.

आरोपीची माहिती काढण्यासाठी पोलिसांना खबऱ्यांचा खर्च खिशाला परवडत नाही.

वसई-विरार शहरातील वाढती गुन्हेगारी ही मोठी समस्या बनली होती. गुन्हेगार चोऱ्या, हल्ले

### खबऱ्यांचा खर्च परवडेना

खबऱ्यांच्या भरवशावर गुन्हे उघड आणण्याचे प्रमाण ठरते. अनेक पोलीस अधिकारी, कर्मचारी स्वतःचे स्वतंत्र नेटवर्क उभारतात. आता खबऱ्यांकडून मोठी डिमांड केली जात आहे.

पुण्यनगरी पू. पान क्र. १

# मीरा रोडमध्ये माजी नगरसेवकाच्या घरात चोरी

## पोलिसांनी चोराला केली अटक

**मीरा रोड ।** मीरा रोड भागातील कॉंग्रेसचे माजी नगरसेवक राजीव मेहरा यांच्या घरात चोरी करणाऱ्यास गुन्हे शाखा कक्ष १ काशिमिरा युनिटने १२ तासात अटक केली. त्याच्याकडून ७४ लाख ६२ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपी हा त्यांच्या बरोबर राहणारा असून, मेहरा यांनी त्याला २० वर्षांपासून मदत केली असल्याने आश्चर्य व्यक्त केले



जात आहे. मीरा रोड शीतलनगर येथील कॉंग्रेसचे माजी नगरसेवक राजीव मेहरा २४ एप्रिल रोजी कामानिमित्त बाहेर होते. घर बंद असताना कोणीतरी अज्ञात चोरट्याने टेरेसचा दरवाजा तोडून कपाटातील ७० लाख रुपये व सोन्या-चांदीचे दागिने असा एकूण ७० लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरी केला. याबाबत मीरारोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. हा गुन्हा लवकरात लवकर उघडकीस आणण्यासाठी वरिष्ठांनी दिलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष १, काशिमिरा युनिटचे अधिकारी व अंमलदार यांनी तपास करून आरोपी संजीवकुमार सदानंद सिंह (रा. शीतलनगर, मीरारोड पूर्व) याला अवघ्या १२ तासांत अटक केली. त्याच्याकडून एकूण ७४ लाख ५० हजार रोख रक्कम व १२ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने असा मुद्देमाल जप्त केला आहे.

Scanned with CamScanner

लोकमत महामुंबई पान

दि. 27/04/2023

# ईडीची बनावट नोटीस, आरोपीला पोलिस कोठडी

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** एका बड्या विकासकास ईडीची बनावट नोटीस दाखवून ६ कोटी ५५ लाखांच्या खंडणीप्रकरणी दाखल गुन्ह्यात काशिमीरा पोलिसांनी बुधवारी पहाटे राजू हमीरमल शाह या आरोपीला अटक करण्यात आली. आरोपीला ठाणे न्यायालयाने त्याला दोन दिवसांची पोलिस कोठडी दिली.

आनंद अग्रवाल, हरीश उर्फ मोंटू अग्रवाल या विकासकांना ईडीची बनावट नोटीस दाखवून ६ कोटी ५५ लाखांच्या खंडणीसाठी धमकवणाऱ्या इस्टेट एजंट गौतम अग्रवाल (अंधेरी), मितेश शाह (भाईंदर) व राजू हमीरमल शाह (भाईंदर) या तिघांविरुद्ध काशिमीरा पोलिसांनी खंडणीचा गुन्हा दाखल केला. वरिष्ठ निरीक्षक संदीप कदम यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू होऊन दिल्लीतून बनावट ईडी नोटीस बनवणाऱ्या कृष्णकुमार ओमप्रकाश कौशिक याला सहायक निरीक्षक प्रशांत गांगुर्डे यांच्या पथकाने अटक केली होती. दरम्यान, राजू शाह याचा अटकपूर्व जामीन ठाणे न्यायालयाने फेटाळून लावला होता.

### याचिकेवर ताशेरे

राजू शाह याच्यावर भाईंदर पोलिस ठाण्यात नऊ गुन्हे दाखल असून उच्च न्यायालयाने २०१७ साली शाहने दाखल केलेल्या एका जनहित याचिकेवर ताशेरे ओढत त्याला १ लाखांचा दंड ठोठावला होता. या बाबी न्यायालयासमोर मांडत शाह याची सात दिवसांची कोठडी मागितली होती. मात्र न्यायालयाने त्याला दोन दिवसांची पोलिस कोठडी दिली आहे. या गुन्ह्यातील ही दुसरी अटक आहे.

# लग्नाच्या आमिषाने परिचारिकेवर अत्याचार



लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** लग्नाचे आमिष दाखवून परिचारिका असलेल्या तरुणीवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना वसईत घडली आहे. २८ वर्षीय तरुणीला भुईगाव येथील आरोपी तरुणाने २०१६ ते ५ जानेवारी २०२३ दरम्यान प्रेमाच्या जाळ्यात अडकवून घरी, हॉटेलवर, कळंब व विरारमधील रिसॉर्टवर नेऊन अनेकवेळा लैंगिक अत्याचार केला होता. पीडित तरुणीने मंगळवारी वालीव पोलिस ठाण्यात आरोपीविरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे.

सामना पान क्र.7

# विरारमध्ये एकाच इमारतीत दोन ठिकाणी घरफोड्या

**वसई, दि. २६ (सा.वा.)** – विरारमधील एकाच इमारतीत दोन ठिकाणी घरफोडीच्या घटना घडल्या आहेत. चोरट्यांनी लाखोंच्या दागिन्यांची व रोख रकमेची लूट करून पोबारा केला असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. पृथ्वी अपार्टमेंटमध्ये हा प्रकार घडला.

नाना-नानी पार्क येथे राहणाऱ्या सतीश धुमाळ यांच्या घरी अज्ञात चोरट्यांनी घराचे लॉक तोडून आत प्रवेश केला. तसेच सोन्याचे मंगळसूत्र, सोन्याची चेन, बांगड्या, लॉकेट, नय तसेच रोख रक्कम असा मुद्देमाल चोरून नेला. सतीश धुमाळ हे गोरेगाव येथे कामाला असून २४ एप्रिल रोजी उशीर झाल्याने ते रात्री शिवडी, येथे नातेवाईकांकडे राहिले होते. अज्ञात चोरट्यांनी घराचे लॉक तोडून घरफोडी केली.

चोरट्यांनी शेजारी राहणाऱ्या स्वप्नील सोनवणे यांच्याही घरात घरफोडी करत ५० हजारांची अशी एकूण १ लाख ३६ हजाराच्या मुद्देमालाची चोरी केली आहे. याबाबत विरार पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संजय बोराडे करीत आहेत.

लोकमत पान क्र.3

# ५५ वयाच्या पोलिसांना दुपारच्या फील्ड ड्युटीत सूट

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** वाहतूक पोलिस शाखेत ५५ वर्षांवरील वाहतूक पोलिस कर्मचाऱ्यांना दुपारी १२ ते ५ या कालावधीत फिल्ड ड्युटी देऊ नये, असे निर्देश सहपोलिस आयुक्त (वाहतूक) प्रवीण पडवळ यांनी दिले आहेत. गेल्या काही दिवसांपासून मुंबईत येणाऱ्या उष्णतेची लाट लक्षात घेत, त्यांनी हे पाऊल उचलल्याचे समजते.

शहरातील वाहतूक विभागाच्या प्रभारी सर्व पोलिस निरीक्षकांना जारी करण्यात आलेल्या या निर्देशात ५५ वर्षांवरील वाहतूक पोलिस कर्मचाऱ्यांना दुपारी १२ ते ५ या वेळेत फील्ड ड्युटी देऊ नये, असे नमूद करण्यात आले आहे. ज्या अधिकाऱ्यांना रक्तदाब आणि मधुमेह यांसारख्या जुनाट आजारांनी ग्रासले आहे किंवा मोठ्या शस्त्रक्रिया झाल्या आहेत, त्यांनाही मार्गदर्शक तत्त्वांनुसार फील्ड ड्युटीवर तैनात केले जाणार नाही. या निर्देशात पुढे म्हटले आहे की, ड्युटीवर तैनात कर्मचाऱ्यांना स्वच्छ पिण्याचे पाणी सहज उपलब्ध असावे. रस्ता आणि वाहतूक पोलिस कर्मचाऱ्यांसह एक वॉर्डन मदतीसाठी नियुक्त करावा. वाहतूक पोलिस कर्मचाऱ्यांना वर्षभर रस्त्यावर उभे राहावे लागते. उन्हाळ्यात कडक उन्हात उभे राहणेही त्यांच्या कर्तव्यात सामील आहे. त्यामुळे वाहतूक पोलिसांची तब्येत उत्तम राहावी आणि चढत्या पाऱ्यामुळे विभागात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी ही मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्यात आली आहेत.

### दुपारच्या वेळेत तरुण अधिकाऱ्यांची नियुक्ती

दुपारच्या वेळेत कर्तव्यासाठी तरुण आणि शारीरिकदृष्ट्या सक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी. त्यांना जोड्यांमध्ये नियुक्त केले जावे आणि जेथे आवश्यक असेल तेथे मदतीसाठी त्यांच्यासोबत एक ट्रॅफिक वॉर्डनदेखील नियुक्त केला जाईल, असे पडवळ यांनी म्हटले आहे. मार्गदर्शक तत्त्वांमध्ये पुढे नमूद केले आहे की, अचानक छातीत दुखणे, चक्कर येणे किंवा इतर आरोग्य समस्या असल्यास कर्तव्यावर असलेल्या संबंधित अधिकाऱ्याला तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करावे.

Scanned with CamScanner

सकाळ पू. पान क्र. 1

दि. 27/04/2023

# पावसाळ्यासाठी आपत्कालीन कक्ष सज्ज

## मिरा-भाईंदर महापालिकेच्या तयारीचा आयुक्तांनी घेतला आढावा

भाईंदर, ता. २६ (बातमीदार) : पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर मिरा-भाईंदर महापालिकेचा आपत्कालीन कक्ष लवकरच कार्यान्वित होणार आहे. मिरा रोड येथील कनाकिया भागातील महापालिकेच्या वास्तूत हा कक्ष स्थापन करण्यात आला आहे. हा कक्ष पावसाळ्यात चोवीस तास सुरू राहणार आहे.

पावसाळा सुरू होण्यासाठी आता एक महिना शिल्लक राहिला आहे. या पार्श्वभूमीवर आयुक्त दिलीप ढोले यांनी आपत्कालीन यंत्रणेचा आढावा घेतला. सध्या शहरात सुरू असलेली स्थापत्यविषयक कामे चोवीस तास सुरू ठेवून कामाची गुणवत्ता राखत ही कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करावीत; तसेच पावसाळा सुरू होण्याआधी सर्व रस्त्यांवर एकही खड्डा राहणार नाही, याची काळजी घेण्याचे आदेश आयुक्तांनी दिले. त्याचबरोबर नाल्यांची साफसफाई करत असतानाच त्यावरील तुटलेली झाकणे त्वरित बदलण्यात यावीत, टेलिफोन कंपनी, वीज कंपनी तसेच इंटरनेट यांच्या नाल्यातील प्रवाहाला अडथळा ठरणाऱ्या केबल तातडीने हटव्यात, अशा सूचनाही आयुक्तांनी दिल्या.

शहरातील ३० वर्षे जुन्या इमारतींना स्ट्रक्चरल ऑडिट करण्याच्या सूचना याआधी जारी करण्यात आल्या होत्या. त्यासंबंधीची सर्व कार्यवाही पूर्ण करून धोकादायक इमारतींची यादी लवकरात लवकर प्रसिद्ध करून त्या पाडण्याची कार्यवाहीदेखील लवकरात लवकर करण्यात यावी, असेही आयुक्तांनी या वेळी सांगितले.

### प्रत्येक प्रभागातही कक्ष सुरू

मिरा रोड येथील मुख्य आपत्कालीन कक्षासोबतच प्रत्येक प्रभागात एक याप्रमाणे आणखी सहा आपत्कालीन कक्ष सुरू केले जाणार आहेत. महापालिकेच्या प्रत्येक विभागीय कार्यालयात पाणीउपसा पंप, तसेच पूरस्थिती निर्माण झालेल्या भागातील रहिवाशांची सुटका करण्यासाठी रबर बोटीदेखील तैनात करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर ज्या ठिकाणी पाणी तुंबण्याची शक्यता आहे, अशा भागातील इमारतींची वीज मीटर सुरक्षित अंतरावर स्थलांतरित करण्याच्या सूचना वीज कंपनीला देण्यात आल्या आहेत.

### प्रथमच पोलिस कर्मचारीही उपस्थित

आतापर्यंत मुख्य आपत्ती व्यवस्थापन कक्षात केवळ महापालिका कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जायची. या वर्षी प्रथमच या कर्मचाऱ्यांसोबत पोलिस कर्मचारीदेखील कक्षात उपस्थित राहणार आहे.

सकाळ पू. पान क्र.3

# ठाकरे गटाला मिरा-भाईंदरमध्ये धक्का

## राष्ट्रीय प्रवक्त्यासह माजी नगरसेविकेचा भाजपमध्ये प्रवेश

भाईंदर, ता. २६ (बातमीदार) : शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे राष्ट्रीय प्रवक्ते शैलेश पांडे यांच्यासह माजी नगरसेविका स्नेहा पांडे यांनी पक्षाला जय महाराष्ट्र करत भाजपमध्ये प्रवेश केला. त्यांच्यासोबत काँग्रेसच्या माजी नगरसेविका सारा अक्रम यांनीही आपल्या समर्थकांसह भाजपचे कमळ हाती घेतले आहे. भाजपच्या प्रदेश कार्यालयात प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत हा प्रवेश पार पडला. या वेळी माजी आमदार नरेंद्र मेहता, अमरजीत मिश्रा आदी उपस्थित होते. शैलेश पांडे यांची भाजपचे प्रदेश प्रवक्ते म्हणून नियुक्ती करण्यात आल्याची घोषणा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी या वेळी केली.

शैलेश पांडे व त्यांच्या पत्नी स्नेहा पांडे हे पूर्वी भाजपमध्येच कार्यरत होते. स्नेहा पांडे या २००७ मध्ये झालेल्या मिरा-भाईंदर महापालिकेच्या निवडणुकीत भाजपच्या नगरसेविका म्हणून निवडून आल्या होत्या. २०१७ मध्ये मात्र त्यांनी भाजपला सोडचिठ्ठी देत शिवसेनेचे शिवबंधन हाती बांधले. शिवसेनेत फूट पडल्यानंतर पांडे पती पत्नी उद्धव ठाकरे यांच्या सोबत राहिल्या. शैलेश पांडे यांची उद्धव ठाकरे गटाचे राष्ट्रीय प्रवक्ते म्हणून काही महिन्यांपूर्वी नियुक्ती झाली होती. मात्र आता दोघेही स्वगृही परतले आहेत. गेल्या आठवड्यात शनिवारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मिरा-भाईंदरमध्ये आले असताना पांडे यांनी त्यांची भेट घेतली होती.

### सारा अक्रम यांची काँग्रेसला सोडचिठ्ठी

काँग्रेसकडून सातत्याने स्वातंत्र्यवीर सावरकरांवर टीका केली जात असल्यामुळेच आपण पक्ष सोडला असल्याचे शैलेश पांडे यांनी यावेळी सांगितले. दुसरीकडे काँग्रेसच्या माजी नगरसेविका सारा अक्रम यांनीदेखील भाजपमध्ये प्रवेश घेतला आहे. सारा अक्रम या नयानगर भागातून काँग्रेसच्या नगरसेविका म्हणून निवडून आल्या होत्या. गेल्या काही काळापासून त्या भाजपच्या संपर्कात होत्या.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज वसईत

विरार, ता. २६ (बातमीदार) : वसईतील तुंगारेश्वर येथील बाल्योगी श्री सदानंद महाराज आश्रम समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या एका धार्मिक कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गुरुवारी (ता. २७) वसईत येत आहेत.

दरम्यान आश्रम समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमासाठी आश्रम व्यवस्थापन समितीकडून जोरदार तयारी सुरू आहे. या कार्यक्रमाला तुंगारेश्वर पर्वत येथे सुरूवात झाली आहे. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत गुरुवारी या कार्यक्रमाची सांगता होणार आहे. मुख्यमंत्री झाल्यानंतर एकनाथ शिंदे प्रथमच वसईमध्ये एका धार्मिक कार्यक्रमाच्या निमित्ताने येत आहेत. भर दुपारी होणाऱ्या कार्यक्रमात बदल करण्यात आला असून मुख्यमंत्री गुरुवारी सायंकाळी ४.३० वाजता तुंगारेश्वर येथे येणार आहेत. हा बदल महाराष्ट्र भूषण कार्यक्रमात झालेल्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. कार्यक्रमादरम्यान मोफत वनौषधी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

Scanned with CamScanner

दि. 27/04/2023

लोकसत्ता पू. पान क्र. 1

# उड्डाणपुलाच्या बंद मार्गिकेवर मद्यपींचा अड्डा

## नायगावमधील प्रकार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** नायगाव पूर्व पश्चिमेला जोडणाऱ्या उड्डाणपुलाची एक मार्गिका बंद आहे. मात्र या बंद मार्गिकेवर मद्यपींचा वावर अधिक प्रमाणात वाढला आहे. या ठिकाणी मद्यपी मद्यपान करून काचेच्या बाटल्या फोडून टाकत असल्याने येथून ये-जा करणाऱ्या प्रवाशांना अडचणी निर्माण होऊ लागल्या आहेत.

नायगाव वसईचा परिसर जोडण्यासाठी वर्षभरापूर्वी नायगाव पूर्व व पश्चिमेला जोडणाऱ्या उड्डाणपुलाचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) ने पूर्ण करून हा पूल वाहतुकीला खुला केला आहे. यामुळे वसईसह महामार्ग व पूर्व पश्चिम प्रवासाचे अंतर कमी झाले असून नागरिकांना फायदा झाला आहे. सध्या जूचंद्र उड्डाण पुलाचे सुरू असलेले काम व पश्चिमेच्या भागातील अपुरे रस्ते यामुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होऊ नये यासाठी या पुलाची एक मार्गिका बंद ठेवण्यात आली आहे.

मार्गिकेवर आता मद्यपींचा वावर अधिक प्रमाणात वाढला आहे. रात्रीच्या सुमारास काही गर्दुल्ले पुलावरच मद्यपान करण्यासाठी बसतात. काही वेळा सोबत आणलेल्या मद्याच्या बाटल्या फोडून त्या ठिकाणी टाकतात तर इतर कचरा टाकणे, लघुशंका करणे असे प्रकार घडतात. मार्गिका बंद असल्याने रेल्वेने प्रवास करणारे प्रवासीही या रस्त्यावरून पायी येतात.

परिसरात राहणारे नागरिक लहानमुलांसह येथे फेरफटका मारण्यासाठी येत असतात. परंतु या भागात बाटल्या फोडून काचा पसरल्या असल्याने पायाला काच रुतून दुखापत होण्याची शक्यता असल्याचे नागरिकांनी सांगितले आहे. या अशा प्रकाराला आळा घालण्यासाठी कारवाई करण्याची मागणी नागरिकांमधून करण्यात येत आहे.



### पोलिसांनी गस्त वाढवावी

मार्गिका बंद असल्याने मोठ्या संख्येने मद्यपी या ठिकाणी येत असतात. सिगारेट ओढणे, मद्य प्राशन करणे असे प्रकार सुरूच असतात. या भागात जे गर्दुल्ले मद्यपान करून बाटल्या फोडणे, धिंगाणा घालणे असे प्रकार करतात त्यांना आवर घालण्यासाठी पोलिसांनी गस्त वाढवावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

Scanned with CamScanner

लोकसत्ता पृ.पान क्र.4

दि. 27/04/2023

# मंजूर पाणी न मिळाल्यास आंदोलन

## मीरा-भाईंदर शहरातील लोकप्रतिनिधींचा 'स्टेम'ला इशारा

लोकसत्ता वार्ताहर

**भाईंदर :** मीरा-भाईदर शहराला स्टेम प्राधिकरणाकडून मंजूर असलेले पाणी हे इतर महापालिकेकडे वळवले जात आहे. तसेच अंजूर येथील मीटरवरील पाण्याच्या नोंदीनुसार पाण्याचे देयक मीरा-भाईदर महापालिकेला पाठवले जात असल्याने प्रति दिन आठ दशलक्ष लिटरच्या पाण्याच्या देयकाचा भुर्दंड सोसावा लागत असल्याचे समोर आले आहे. दरम्यान, येत्या आठवडाभरात शहराला मंजूर असलेले पाणी न दिल्यास स्टेम प्राधिकरणाच्या कार्यालयात आंदोलन केले जाईल, असा इशारा सर्वपक्षीय नेत्यांनी दिला आहे.

मीरा-भाईदर शहराला स्वतंत्र पाण्याचा स्त्रोत नसल्यामुळे 'स्टेम' आणि 'एमआयडीसी'कडून होणाऱ्या पाणीपुरवठ्यावर अवलंबून राहावे लागत आहे. यात 'स्टेम'कडून शहराला ८६ दशलक्ष लिटर, तर 'एमआयडीसी'कडून १३५ दशलक्ष लीटर पाणीपुरवठा मंजूर आहे. त्यानुसार दररोज २२१ दशलक्ष पाणी मिळण्याऐवजी प्रत्यक्षात २१० दशलक्ष लीटर पाणी मिळत आहे. 'स्टेम' प्राधिकरणात मीरा-भाईदर महापालिकेची ३३ टक्के मालकी आहे. गेल्या काही महिन्यांपासून पाणीपुरवठ्यात कपात करण्यात आल्याने शहरात मोठ्या प्रमाणात पाणीटंचाई जाणवत आहे. त्यामुळे सर्वपक्षीय नेते आक्रमक झाल्याने त्यावर तोडगा काढण्यासाठी बुधवारी महापालिका मुख्यालयात 'स्टेम' आणि 'एमआयडीसी'च्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली होती.

यावेळी शहराला 'स्टेम'कडून मंजूर असलेले पाणी मिळत नाही. महापालिकेने येणाऱ्या पाण्याचे मोजमाप करण्यासाठी चेना येथे मीटर बसवले आहे. मात्र, 'स्टेम'कडून ठाण्याजवळील अंजूर येथील मीटर प्रमाणेच पाण्याची नोंद घेऊन त्याप्रमाणे पालिकेला पाण्याचे देयक पाठवले जात आहे. अंजूर येथील मीटरवर नोंद घेतल्यानंतर पाणी चेना येथील मीटरमध्ये नोंदवले जाण्यापूर्वीच अन्यत्र वळवले जात आहे. त्यामुळे प्रति दिन आठ दशलक्ष लिटरच्या पाण्याच्या देयकाचा भुर्दंड सोसावा लागत आहे, असा आरोप महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी बैठकीत केला आहे.

मीरा-भाईदरला मंजूर असलेले पाणी दिले जात नसतानाच दुसरीकडे मात्र ठाणे आणि भिवंडी-निजामपूर महापालिकेला मंजूर कोट्यापेक्षा अतिरिक्त पाणी दिले जात असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. यावेळी उपस्थित लोकप्रतिनिधींनी 'स्टेम'चे संचालक संकेत घरत यांच्याविरोधात आक्रमक भूमिका घेतली. तसेच येत्या काळात 'स्टेम'ने शहराला मंजूर असलेले पाणी आणि अतिरिक्त १२ दशलक्ष लिटर पाणी महापालिकेला द्यावे, अशी मागणी केली. या वेळी आमदार गीता जैन, माजी महापौर ज्योत्स्ना हसनाळे, माजी सभागृह नेते प्रशांत दळवी, माजी शिवसेना गटनेत्या नीलम ढवन, काँग्रेसचे माजी गट नेते जुबेर इनामदार आदी उपस्थित होते.

### ठाणे महापालिकेकडून पाणी चोरी

'स्टेम'ची स्थापना ठाणे महापालिका, मीरा-भाईदर महापालिका, भिवंडी-निजामपूर महापालिका आणि ठाणे जिल्हा परिषद, अशा चार संस्थांची मिळून केली आहे. मात्र, कालांतराने या संस्थेचे रूपांतर कंपनीत झाले असून, ती कंपनी कायद्यानुसार कार्यरत आहे. सध्या या कंपनीत ठाणे महापालिकेची ५१ टक्के भागीदारी आहे. त्यामुळे या प्राधिकरणाच्या अध्यक्षपदी ठाणे महापालिकेचे आयुक्त व राजकीय पुढारी असल्यामुळे ते मनमानी करून मीरा-भाईदरला सापत्न वागणूक देतात. इतकेच नव्हे तर मीरा-भाईदरची स्वतंत्र जलवाहिनी असतानाही त्यात ठाणे महापालिका अतिरिक्त वाहिनी जोडून पाणी चोरी करत असल्याचे आरोप लोकप्रतिनिधींनी बैठकीत केले.

# महामार्गावर राडारोडा वाढला

## विल्हेवाटीचा प्रश्न गंभीर, वाहनांच्या अपघाताची भीती



लोकसत्ता प्रतिनिधी

**वसई :** मुंबई-अहमदाबाद महामार्गावर राडारोडा टाकण्याचे प्रकार दिवसेंदिवस प्रचंड प्रमाणात वाढू लागले आहेत. मुख्य महामार्गालगत हा राडारोडा टाकला जात असल्याने वाहनांच्या अपघाताची भीती व्यक्त होत आहे.

वसई पूर्वेतील भागातून मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग गेला आहे. आधीच या महामार्गावर वाहनचालकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत असताना मागील दोन ते तीन वर्षांपासून महामार्गावर राडारोडा टाकला जात आहे.

वसई-विरार शहरांसह विविध ठिकाणच्या भागांत विकासकामे सुरू असून, खोदकाम, जुनी बांधकामे तोडणे, यामुळे मोठ्या प्रमाणात राडारोडा वाढला आहे. या राडारोड्याची विल्हेवाट लावण्याऐवजी तो थेट मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर आणून टाकला जात आहे. वर्सोवा पुलापासून ससूनवघर, मालजीपाडा, चिंचोटी, नायगाव, सातिवली फाटा, पेल्हार, विरार, अशा विविध ठिकाणी हा राडारोडा टाकल्याचे पाहावयास मिळत आहे. सुरुवातीला हा राडारोडा सेवा रस्त्यावर टाकला जात होता. आता थेट मुख्य महामार्गावर आणून टाकला जात असल्याचे नागरिकांनी सांगितले आहे.

या वाढत्या राडारोड्यामुळे महामार्गाची अक्षरशः बिकट अवस्था बनू लागली आहे. त्यासाठी यावर लवकरात लवकर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

### नैसर्गिक मार्ग बंद होण्याची भीती

मागील काही वर्षांपासून महामार्गालगत झालेला माती भराव व बुजविण्यात आलेले नैसर्गिक नाले, यामुळे महामार्ग पाण्याखाली जात आहे. त्याचा मोठा फटका वाहतुकीला बसत आहे. आता तर राडारोड्याचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे पावसाच्या पडणाऱ्या पाण्याचा निचरा होण्यास अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे.

### रात्रीस खेळ चाले

राडारोड्याने भरलेल्या गाड्या रात्रीच्या सुमारास छुप्या मार्गाने रिकाम्या केल्या जात आहेत. या वाहनावर कोणाचेही नियंत्रण नसल्याने महामार्गावर मिळेल त्या जागी राडारोडा टाकला जात आहे. त्यामुळे मागील काही महिन्यांपासून अधिक प्रमाणात राडारोडा वाढला आहे.

Scanned with CamScanner